




जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे



BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER



दैनिक | वर्ष १ | अंक २३३ | गुरुवार, १९ मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210


## एमआयटीला कायदेशीर भाषेत उत्तर देऊ : संचालक प्रशांत काळभोर

### लोणी काळभोर येथील कचरा प्रश्नी आयोजित ग्रामसभा तहकूब

**लोणी काळभोर, ता. १८ :** एमआयटी शिक्षण संस्थेने तेथे शिक्षण घेणाऱ्या लहान - मोठ्या मुलांचा वापर कचऱ्या संदर्भात आंदोलन करण्यासाठी करुन राजकारण केलेले आहे. त्यावेळी गावकऱ्यांनी विरोध वाढवला असता तर आमच्या बरोबरच त्या तरुण मुलांच्यावरही वेगवेगळे गुन्हे दाखल झाले असते. त्या मुलांच्या भविष्याचा विचार करून आम्ही सबुरीचे धोरण स्वीकारले. या धोरणाला जर एमआयटी शिक्षण संस्था जर कमजोरी समजत असेल तर तो त्यांचा गैरसमज आहे. त्यांना आम्ही कायदेशीर भाषेत उत्तर देऊ असा खणखणीत इशारा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत काळभोर यांनी दिला.

हवेली तालुक्यातील लोणी काळभोर व कदमवाकवस्ती या दोन्ही ग्रामपंचायतींच्या हद्दीत गोळा होणारा कचरा गेली २५ - ३० वर्षे मुळा मुठा नदी किनारी असलेल्या शासकीय जागेत टाकला जातो. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी या कचऱ्याला भीषण आग लागली होती. त्या नंतर एमआयटी मधील विद्यार्थ्यांनी तेथे कचरा टाकूनये म्हणून आंदोलन केले व नदीकडे जाणारा रस्ता बंद केला होता. त्यानंतर पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, हवेलीचे उपविभागीय अधिकारी यशवंत माने, लोणी काळभोरच्या अप्पर तहसीलदार तृप्ती कोलते, दोन्ही ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामसेवक यांनी कचऱ्याच्या जागेला प्रत्यक्ष भेट दिली. मात्र या प्रश्नावर अद्यापही तोडगा निघालेला नाही. त्यामुळे दोन्ही ग्रामपंचायतींच्या हद्दीतील कचऱ्याचा हा प्रश्न जटिल बनला आहे.

या संदर्भात चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी लोणी काळभोर ग्राम पंचायतीची ग्रामसभा ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. यावेळी प्रशांत काळभोर बोलत होते. गणपुर्ती अभावी हि सभा तहकूब करण्यात आली. यावेळी प्रशासक सरपंच नागेश काळभोर,



माजी सरपंच राजाराम काळभोर, राहुल काळभोर, ग्रामविकास आधिकारी एस एन गवारी, माजी उपसरपंच राजेंद्र काळभोर, साधना बॅन्केचे संचालक प्रताप बोरकर, माजी ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब काळभोर, कृष्णा पवार, पांडुरंग केसकर, विविध कार्यकारी संस्थेचे माजी अध्यक्ष विठ्ठल काळभोर, अंबरनाथ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष हेमंत गायकवाड, शिवसेना नेते रमेश भोसले, युवराज काळभोर, विनायक कांबळे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रशांत काळभोर पुढे म्हणाले एमआयटी मधील गट क्रमांक ३९ मधील रस्ता गायब करण्यात आला आहे. ओढ्यावर अतिक्रमण करून ओढा गायब करण्यात आला आहे. एम आयटी शिक्षण संस्थेला स्वतःचा कचरा प्रक्रिया प्रकल्प नाही. आजही एमआयटी मधील कचरा नदीपात्रात टाकला जातो. सरकारी जागेत ग्राम पंचायतीच्या वतीने टाकण्यात येणारा कचरा कुणा एका व्यक्तीच्या घरातील कचरा नसून तो ग्रामपंचायतीचा कचरा आहे, हे एमआयटीने लक्षात घ्यावे.

या कचरा प्रश्ना बद्दल लोणी काळभोर गावातील नागरिकही अद्याप जागरूक झालेले नाहीत. कचरा हा आपला प्रश्न नसून ग्राम पंचायतीचा प्रश्न आहे असे काही नागरिकांना वाटते, हि विचारसरणी पूर्णपणे चुकीची आहे. आजच्या ग्रामसभेला सरपंचांसह फक्त तीनच ग्रामपंचायत सदस्य उपस्थित आहेत. तसेच स्थानिक नागरिकांचीही उपस्थिती कमी आहे. त्यामुळे हि ग्राम सभा तहकूब करुन नंतर बोलावण्यात यावी असा ठराव प्रशांत काळभोर यांनी मांडला.

यावेळी एमआयटी संस्थेची भूमिका आडमुठी व अडेलतट्टू पणाची आहे असे मत शिवसेना नेते रमेश भोसले यांनी व्यक्त केले. या नंतर ग्रामसभा तहकूब करुन नंतर घेण्याचे ठरविण्यात आले.

> ‘ अगोदर लोणी काळभोर गाव येथे आहे, एमआयटी नंतर आली आहे. एमआयटीचा गावाकडे बघण्याचा दृष्टीकोन पूर्वग्रहदूषित आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवण्याच्या वेळी मी स्वतः त्याचा अनुभव घेतला आहे. एमआयटी मध्ये गावच्या मालकीच्या असलेल्या रस्त्यावरुन स्थानिक नागरिकांना जाणे येणे बंद केले आहे. मलाही या रस्त्यावरुन एकदा जाऊ दिले नाही. आगामी काळात जर एखाद्या दलित बांधवाला गावच्या मालकीच्या रस्त्यावरुन जायला प्रतिबंध केला तर एमआयटी विरोधात अट्रॉसिटीचा (दलित अत्याचार प्रतिबंधक कायदा) गुन्हा दाखल करण्यात येईल असा इशारा सुर्यकांत गवळी यांनी दिला.
>
> \- **सुर्यकांत गवळी,** प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी ग्राहक संरक्षण कक्ष

### संक्षिप्त

#### सनसिटी रस्त्यावरील तरुणाच्या खून प्रकरणात तीन अल्पवयीन ताब्यात

**पुणे, ता. १८ :** वैमनस्यातून दुचाकीस्वार तरुणाचा खून करून पसार झालेल्या तीन अल्पवयीनांना गुन्हे शाखेच्या दरोडा आणि वाहन चोरी विरोधी पथकाने ताब्यात घेतले. करण गिरीश काशीद (वय-१९) असे खून झालेल्याचे नाव आहे. अल्पवयीन आणि करण यांच्यात एकमेकांकडे पाहण्यावरुन वाद झाला होता. सोमवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास दुचाकीस्वार करण सिंहगड रस्ता भागातील सनसिटी परिसरातून निघाला होता. त्या वेळी अल्पवयीनांनी त्याला अडवून कोयत्याने वार केले. आरोपींनी केलेल्या हल्ल्यात करण गंभीर जखमी झाला. सनसिटी परिसरात झालेल्या खून प्रकरणात परिसरात घबराट उडाली होती. पसार झालेले अल्पवयीन हे कर्वेनगर परिसरातील वनदेवी मंदिराजवळ थांबल्याची माहिती गुन्हे शाखेच्या दरोडा आणि वाहन चोरी विरोधी पथकाला मिळाली. त्यानंतर पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले. खून प्रकरणानंतर पोलिसांनी दोन तासात अल्पवयीनांना ताब्यात घेतले.

#### लोणी काळभोर येथे अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू

**लोणी काळभोर, ता. १८ :** भरधाव वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना पुणे-सोलापूर रस्त्यावरील लोणी काळभोर भागात घडली. अपघातानंतर पसार झालेल्या वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. धडक इतकी जोरात होती की, गंभीर जखमी झालेल्या दुचाकीस्वाराचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. अकबर चाँद शेख (वय-३९, रा. होरेब नगर, कदमवाक वस्ती, ता. हवेली) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. याबाबत त्यांचा मुलगा रेहान (वय १८) याने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी मध्यरात्री अडीच वाजेच्या सुमारास अकबर शेख हे आपल्या दुचाकीवरून पुणे-सोलापूर रस्त्याने निघाले होते. ते शांताई हॉस्पिटलच्या समोर आले असता, पाठीमागून येणाऱ्या एका भरधाव वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली आणि चालक न थांबता अंधाराचा फायदा घेऊन पसार झाला. दरम्यान, या अपघातात गंभीर जखमी झालेल्या अकबर शेख यांना स्थानिकांनी तातडीने जवळच्या खाजगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी मुलगा रेहान शेख याने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

## आमदार नरेंद्र मेहतांच्या अडचणीत वाढ; महसूल मंत्र्यांनीच पत्रात केला भूमाफिया असा उल्लेख

**मुंबई, ता. १८ :** मिरा-भाईंदरमधील भाजपचे आमदार नरेंद्र मेहता यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली असून, थेट पंतप्रधान कार्यालयाने दिलेल्या आदेशानंतर आता त्यांच्यावर कारवाईची टांगती तलवार आहे. मेहता यांच्यावर जमिनी बळकावल्याचा आणि सरकारची करोडो रुपयांची स्टॅम्प ड्युटी बुडवल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी एका सरकारी पत्रात नरेंद्र मेहता यांचा उल्लेख भूमाफिया असा केल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. हे पत्र सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत असून विरोधकांनी यावरून सरकारला धारेवर धरले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, मेहता यांनी आदिवासी आणि इतर समाजातील लोकांच्या जमिनी नियमबाह्य पद्धतीने ताब्यात घेतल्याचा दावा केला जात आहे. या व्यवहारांमध्ये त्यांनी सरकारची जवळपास ४०० ते ५०० कोटी रुपयांची स्टॅम्प ड्युटी बुडवली असल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी हे प्रकरण लावून धरले असून त्यांनी महसूलमंत्र्यांचे ते वादग्रस्त पत्र माध्यमांसमोर आणले आहे. हे पत्र २० जून २०२५ रोजी महसूल विभागाकडून पाठवण्यात आले होते. यामध्ये मेहता यांच्या सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रक्शन कंपनीकडून थकीत महसूल वसुलीबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

या पत्रावर महसूलमंत्री बावनकुळे यांची स्वाक्षरी असल्याचा दावा नाना पटोले यांनी केला आहे. हे पत्र आता विधानसभेत मांडले जाणार असल्याने या प्रकरणाला मोठे वळण मिळण्याची शक्यता आहे. दुसरीकडे बावनकुळे यांनी यावर स्पष्टीकरण देताना म्हटले आहे की, तक्रारदाराने जो विषय मांडला होता, त्याला अनुसरूनच पत्रात उल्लेख केला आहे. यामध्ये कोठेही आमदार असा शब्द वापरलेला नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, आमदार नरेंद्र मेहता यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. नाना पटोले करत असलेले आरोप बिनबुडाचे असून आपली कोणतीही थकबाकी नाही आणि आपण कोणताही गैरव्यवहार केलेला नाही, असा दावा मेहता यांनी केला आहे. मात्र या पत्रयुद्धामुळे भाजपची प्रतिमा मलिन होत असल्याची चर्चा सध्या रंगली आहे.

## लॉजवर पोलिसांची धाड, महिला–पुरुष ताब्यात; कारवाईपेक्षा मांडवलीचाच गाजावाजा

**उरुळी कांचन, ता. १७ :** लॉजवर पोलिसांची धाड, महिला-पुरुष ताब्यात, मांडवलीही झाली, चर्चाही झाली, पण कारवाई नेमकी कोणी केली? उरुळी कांचन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. त्यामुळे ही कारवाई पोलीस की स्पेशल २६ टीमने केली आहे. अशा उलटसुलट चर्चा सध्यातरी पूर्व हवेलीत जोरदार सुरु आहेत.

उरुळी कांचन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका लॉजवर सोमवारी (ता. १६) दुपारी छापा टाकून वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश केल्याची माहिती समोर येत असतानाच, या कारवाईवरच संशयाचे ढग दाटले आहेत. या छाप्यात ४ ते ५ महिला आणि दोन पुरुषांना ताब्यात घेतल्याची खात्रीशीर माहिती मिळत असली, तरी कारवाईनंतर मोठी




आर्थिक मांडवली झाल्याने संपूर्ण प्रकरण दाबले गेले असल्याची जोरदार चर्चा उरुळी कांचन सह परिसरातील नागरिकांमध्ये रंगली आहे.

या घटनेतील सर्वात गंभीर बाब म्हणजे, उरुळी कांचन पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा या दोन्ही यंत्रणांनी या छाप्याबाबत सरळ इन्कार केला आहे. आम्ही अशी कोणतीही कारवाई केलेली नाही असे स्पष्ट सांगितल्याने प्रकरण अधिकच गूढ बनले आहे. विशेष म्हणजे, २४ तास उलटूनही पोलीस ठाण्यात गुन्ह्याची कोणतीही नोंद नसणे, ही बाब लोकशाही व्यवस्थेसाठी धोकादायक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

छाप्यानंतर ताब्यात घेतलेल्या व्यक्तींची कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. ना गुन्हा दाखल, ना अधिकृत निवेदन त्यामुळे नेमका छापा कोणी टाकला? हा प्रश्न अधिकच तीव्र झाला आहे. या घटनेनंतर परिसरात अफवांना उधाण आले असून, हा छापा अधिकृत होता की बनावट पथकाने टाकलेली कारवाई होती, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. काही नागरिकांनी तर हा प्रकार स्पेशल २६ चित्रपटातील बनावट छाप्यासारखाच असल्याची शक्यता व्यक्त केली आहे.

दरम्यान, जर ही अधिकृत कारवाई असेल तर ती दडपण्यामागे नेमके कारण काय? आणि जर हा बनावट छापा असेल, तर नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी कोण घेणार? असे संतप्त सवाल आता उरुळी कांचनसह परिसरातून उपस्थित होत आहेत.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून सत्य बाहेर आणावे आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## प्रेमविवाहाच्या रागातून नातेवाईकावर दगडाने हल्ला

**सासवड, ता. १८ :** पाच वर्षांपूर्वी झालेल्या प्रेमविवाहाचा राग मनात धरून एका तरुणाने आपल्याच नातेवाईकावर प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. देवडी (ता. पुरंदर) गावातील भरवस्तीत असलेल्या चावडीसमोर सोमवारी (ता. १६) रात्री आठ वाजण्याच्या सुमारास हि घटना घडली आहे. झालेल्या या राड्यामुळे गावात मोठी खळबळ उडाली असून, सासवड पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहेत.

संपत भागुजी भोसले (वय ४३, रा. देवडी, ता. पुरंदर) यांनी सासवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार सोन्या उर्फ तुषार राजेंद्र भोसले याच्यावर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी संपत भागुजी




भोसले (वय-४३, रा. देवडी) यांचा भाचा गणेश उमेश खुटवड याने पाच वर्षांपूर्वी आरोपी सोन्या उर्फ तुषार राजेंद्र भोसले याच्या बहिणीशी प्रेमविवाह केला होता. या लग्नाला पाच वर्षे उलटून गेली असली, तरी आरोपी तुषारच्या मनातील राग शांत झाला नव्हता.

सोमवारी संध्याकाळी आठ वाजण्याच्या सुमारास हा जुना राग उफाळून आला. देवडी गावातील चावडीसमोर फिर्यादी असताना, आरोपी तुषार भोसले याने त्यांना गाठले. तुझ्या नातेवाईकाने माझ्या बहिणीशी लग्न का केले? याच वादातून आरोपीने रागाच्या भरात हातातील मोठा दगड संपत भोसले यांच्या डोक्यात डाव्या बाजूला जोराने मारला. या हल्ल्यात फिर्यादी गंभीर जखमी झाले असून त्यांच्या डोक्याला मोठी दुखापत झाली.

दरम्यान, यावेळी आरोपी तुषार भोसले याने शिवीगाळ करत तुला आता जिवंत सोडणार नाही,असे म्हणून जीवे मारण्याची धमकीही दिली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी तुषार भोसले याच्यावर भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ११८ (२), ३५२ , ३५१ (२) आणि (३) नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार जाधववर करीत आहेत.

## हवेलीत एकही दिव्यांग विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये : सभापती युवराज काकडे

### १४५ मुख्याध्यापक अन् शिक्षकांसाठी कार्यशाळा संपन्न

**थेऊर, ता. १८ :** शिक्षक हे समाजाचे आधारस्तंभ असून त्यांच्याच माध्यमातून दिव्यांग विद्यार्थ्यांच्या जीवनात प्रकाशाची किरणे पोहोचू शकतात. समावेशित शिक्षणाच्या संकल्पनेतून प्रत्येक दिव्यांग विद्यार्थ्याला सन्मानाने शिक्षणाच्या मूळ प्रवाहात टिकवून ठेवणे ही काळाची गरज आहे. तालुक्यात एकही दिव्यांग विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही, याची जबाबदारी आपण सर्वांनी मिळून घेऊया, असे प्रतिपादन हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे यांनी केले.

हवेली तालुक्यातील १४५ मुख्याध्यापक आणि शिक्षकांसाठी आयोजित ‘समावेशित शिक्षण सक्षमीकरण’ कार्यशाळेच्या




उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर गटशिक्षणाधिकारी हेमंतकुमार खाडे, विस्तार अधिकारी निलेश धानापुणे, तज्ञ मार्गदर्शक वैभव पोरे, डॉ. पल्लवी फुलपगार, गायत्री नवले, मोनिषा, प्राचार्य कश्मीरी शाहेदा यांच्यासह विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ मार्गदर्शक उपस्थित होते.

या कार्यशाळेत दिव्यांगत्वाच्या विविध पैलूंवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. अध्ययन अक्षमता या विषयावर वृद्धी एज्युकेशन फाउंडेशनच्या मोनिशा, डॉ. पल्लवी फुलपगार आणि गायत्री नवले यांनी विद्यार्थ्यांची ओळख व त्यांच्या अध्यापन पद्धती यावर मार्गदर्शन केले. समावेशित शिक्षण महत्व या विषयावर वैभव पोरे यांनी, विशेष शिक्षक नवनाथ दर्शिले यांनी प्रशस्त अँप विषयी मार्गदर्शन केले.

२१ दिव्यांग प्रवर्ग ओळख या विषयावर विशेष शिक्षिका सुवर्णा पुंडे यांनी कायद्यानुसार असलेल्या २१ प्रवर्गांची सविस्तर माहिती दिली. तसेच आनंददायी शिक्षण व सवलती या विषयावर विशेष शिक्षक श्री. संतोष देशमुख यांनी माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना गटशिक्षणाधिकारी हेमंतकुमार खाडे यांनी स्पष्ट केले की, तालुक्यातील सर्व शिक्षक एकजुटीने गुणवत्ता वाढवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. विशेष शिक्षकांच्या मदतीने ही गुणवत्ता अधिक उंचावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशेष शिक्षक संतोष देशमुख यांनी केले, तर उपस्थितांचे आभार विस्तार अधिकारी निलेश धानापुणे यांनी मानले. सदर कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी विशेष शिक्षक सुवर्णा पुंडे, गोपाळ शिवशरण, बबीता चव्हाण, ज्योती वाल्हेकर, साहीर सय्यद, संतोष देशमुख, बाळू चव्हाण, दिशा शेवाळे आणि सुनीता गिरी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## संक्षिप्त

### हडपसर येथे खून करण्यासाठी कोयते बाळगणारे अल्पवयीन ताब्यात




**हडपसर, ता. १८ :** किरकोळ वादातून एकाचा खून करण्यासाठी कोयते बाळगणाऱ्या चौघा अल्पवयीनांना गुन्हे शाखेने ताब्यात घेतले. हडपसर परिसरात ही कारवाई करण्यत आली. त्यांच्याकडून कोयते, गिलवर, दुचाकी असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या प्रकरणी अल्पवयीनां विरुद्ध हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस कर्मचारी शेखर काटे यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अल्पवयीनांचा एकाशी वाद झाला होती. १७ मार्च रोजी गुन्हे शाखेच्या युनिट सहाचे पथक हडपसर परिसात गस्त घाल होते. त्या वेळी एकाच दुचाकीवरुन चौघे जण निघाले असून, त्यांच्याकडे कोयते असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी लक्ष्मीमाता मंदिराजवळ सापळा लावून दुचाकीवरील चौघा अल्पवयीनांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून कोयते, गिलवर जप्त करण्यात आली. दरम्यान, चौकशीत अल्पवयीनांनी एकाचा खून करण्यासाठी कोयते बाळगल्याची कबुली दिली. पोलीस उपनिरीक्षक रत्नदीप बिराजदार तपास करत आहेत.

### शिवसेना ठाकरे गटाला मोठा धक्का

**मुंबई, ता. १८ :** विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्ली गाठून मंगळवारी संसदेमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी तब्बल दीड तास चर्चा केली. त्यांनी अचानक केलेल्या या दौऱ्याची राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली होती. यादरम्यान दिल्ली दौऱ्याहून परतताच शिंदे यांनी ठाकरे गटाला मोठा धक्का दिला आहे. अकोला महापालिकेतील ठाकरे गटाच्या पैकी  नगरसेवकांनी शिंदे गटात प्रवेश केला आहे. खुद्द उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या अधिकृत एक्स अकाउंटवरून त्या संदर्भातील पोस्ट शेअर केली आहे. उबाठा गटाचे अकोला जिल्हाध्यक्ष मंगेश काळे यांच्यासह अकोला महानगरपालिकेतील नगरसेवक मनोज पाटील, सागर भरूका, सोनाली सरोदे, सुरेखा काळे यांनी हाती भगवा घेत शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. या सर्वांचे पक्षात स्वागत करून त्यांना भावी यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या, असे शिंदे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

### मंत्र्याच्या जावई अन् मुलीवर घोटाळ्याचा आरोप

**अहिल्यानगर, ता. १८ :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे अहिल्यानगरचे खासदार निलेश लंके यांनी भाजपाचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मुलीसह जावयावर जमीन घोटाळ्याचा गंभीर आरोप केला आहे. श्रीरामपूर तालुक्यातील चार हजार एकर जमीन ZR२ या कंपनीला देण्याची प्रक्रिया सुरू होती. मंत्री विखे यांचे जावई अजित ढोकणे त्या कंपनीचे संचालक होते. ही जमीन खाजगी कंपनीला देण्यामागे राजकीय हस्तक्षेप असल्याचा संशय लंकेयांनी व्यक्त केला आहे. यासाठी तीन मंत्र्यांची समिती स्थापन करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले आहे. त्यासोबतच ZR२ कंपनीच्या खात्यात अवघ्या एका महिन्यात १०० कोटी रुपये जमा झाल्याचा दावा लंकेयांनी केला आहे. हा पैसा हवाला मार्गाने आला असण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली असून या व्यवहारांची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी खासदार लंकेयांनी केली आहे. त्यांच्या या आरोपांमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

# रेल्वे प्रशासनाचा कोरेगाव मूळ गेटवर 'गनिमी कावा'

## भूसंपादनाआधीच रस्ता रोखल्याने शेतकरी आक्रमक

**उरुळी कांचन, ता. १८ :** कोरेगाव मूळ (ता. हवेली) येथील रेल्वेफाटक क्र. ८ वरील उड्डाणपुलाच्या कामासाठी मंगळवार (ता. १७) पासून सदर गेट बंद करण्यात आले आहे. रेल्वे उड्डाणपुलाच्या कामाबद्दल रेल्वे प्रशासनाने तथा संबंधित ठेकेदाराने ग्राम पंचायत, पोलीस पाटील कार्यालय, तसेच ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी या पुलासाठी संपादित केल्या जाणार आहेत अशा शेतकऱ्यांना नोटीसा देणे आवश्यक होते, मात्र अशा प्रकारची कोणतीही नोटीस न देताच हे काम सुरु होणार असल्याने बाधित शेतकरी आंदोलनाच्या तयारीत आहेत.




कोरेगाव मूळ (ता. हवेली) येथील रेल्वे गेट कोणतीही पूर्वकल्पना न देता गेट बंद केले. अचानक बंद केल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी या पुलासाठी संपादित केल्या जाणार आहेत, त्यांचे भूसंपादन पूर्ण होण्याआधीच आणि कोणतीही पूर्वकल्पना न देता हा मार्ग बंद करण्यात आल्याने शेतकरी मोठ्या संभ्रमात पडले आहेत. आमची जमीन अद्याप आमच्या ताब्यात असताना कामाला सुरुवात कशी झाली? असा संतप्त सवाल आता शेतकरी विचारत आहेत.रेल्वे उड्डाणपुलाचे काम होणे गरजेचे असले तरी, त्यासाठी ठरलेली कायदेशीर प्रक्रिया धाब्यावर बसवण्यात आल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केली आहे. नियमानुसार, भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करून, संबंधित शेतकऱ्यांना मोबदला देऊन आणि पूर्वकल्पना देऊनच कामाला सुरुवात करणे अपेक्षित असते. मात्र, गुरुवारी कोणत्याही प्रकारची नोटीस न देता अचानक रेल्वे गेट बंद करण्यात आले.

भूसंपादन झालेले नाही, आम्हाला कोणताही मोबदला मिळालेला नाही, मग प्रशासनाने उड्डाणपुलाचे काम कागदावरच सुरू केले की काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. उड्डाणपुलासाठी शेतकऱ्यांशी संवाद साधणे गरजेचे होते. मात्र, प्रशासनाने थेट गेट बंद करून शेतकऱ्यांना कोंडीत पकडल्याने शेतकरी वर्गात प्रचंड नाराजी आहे.

दरम्यान, अचानक झालेल्या या कारवाईमुळे कोरेगाव मूळ परिसरात तणावाचे वातावरण असून, प्रशासनाने तातडीने खुलासा करावा अशी मागणी होत आहे.

> २०१३ सालचे रेल्वे उड्डाणपुलाचे ७/१२ चे शेरे आधी काढा आणि भूसंपादन करून शेतकऱ्यांना मोबदला द्या त्यानंतरच रेल्वे उड्डाणपुलाचे काम चालू करा. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले, तर हे काम रोखून धरणार आहे.
> - **मुकिंदा काकडे,** शेतकरी, कोरेगाव मूळ, ता. हवेली

### पुण्यातील धायरी परिसरात घरफोडीची घटना

**पुणे, ता. १८ :** सदनिकेच्या दरवाजाच्या परिसरातील पादत्राणे ठेवण्याची जाळी (शूरॅक), कुंडी, तसेच दरवाज्याजवळ चावी ठेवणे महागात पडले. सिंहगड रस्त्यावरील धायरी परिसरात एका महिलेने सदनिकेच्या बाहेर ठेवलेल्या पादत्राणांच्या जाळीत चावी ठेवली होती. चोरट्यांनी चावी चोरून सदनिकेचे कुलूप उघडले. कपाटातून दीड लाख रुपयांचा ऐवज चोरून चोरटे पसार झाले. या प्रकरणी नांदेड सिटी पोलिसांनी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत एका महिलेने नांदेड सिटी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला या धायरीतील रायकर मळा परिसरात असलेल्या श्री हाईट्स इमारतीत राहायला आहेत. १६ मार्च रोजी त्या सकाळी दहाच्या सुमारास सदनिका बंद करुन कामाला गेल्या. त्यांनी सदनिकेची चावी पादत्राणांच्या जाळीत ठेवली होती.

# लाखेवाडी येथे महाराजस्व समाधान शिबिर; सामान्य नागरिक केंद्रबिंदू : दत्तात्रय भरणे

## आपले सरकार आपल्या दारी संकल्पनेला लाखेवाडीत बळ

**आदित्य बोराटे**

इंदापूर, ता. १८ : तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांना केंद्रबिंदू मानून शासनाच्या योजना व सेवा प्रत्येकापर्यंत पोहोचल्या पाहिजेत, असे प्रतिपादन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले. लाखेवाडी (ता. इंदापूर) येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात ते बोलत होते.

भरणे म्हणाले की, प्रशासनाने लोकांच्या समस्या समजून घेत त्यांचे तातडीने निराकरण केले पाहिजे. नागरिकांना विविध दाखले, महसुली सेवा व शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी मिळावा, यासाठी अशा शिबिरांचे आयोजन महत्त्वाचे आहे. अधिकाऱ्यांनी संवेदनशीलतेने काम करत प्रत्येक नागरिकाचे प्रश्न



मार्गी लावावेत, असेही त्यांनी सांगितले.

या शिबिरात विविध शासकीय विभागांच्या माध्यमातून नागरिकांच्या तक्रारी ऐकून त्यावर तत्काळ कार्यवाही करण्यात आली. उत्पन्न, जात, निवासी दाखले, जमीन विषयक प्रकरणे तसेच इतर महसुली सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यामुळे नागरिकांचा वेळ व खर्च वाचला असून शिबिराला मोठा प्रतिसाद मिळाला.लाखेवाडी येथे आयोजित महाराजस्व समाधान शिबिरामुळे नागरिकांच्या समस्या सोडवण्यास मोठी मदत झाली. याप्रसंगी प्रांतअधिकारी वैभव नावडकर, तहसीलदार जीवन बनसोडे यांनी शिबिरासंदर्भात माहिती दिली. यावेळी गटविकास अधिकारी सचिन खुडे,पंचायत समिती सभापती हर्षवर्धन लोंढे, उपसभापती जयकुमार कारंडे, हनुमंत कोकाटे, प्रताप पाटील, अतुल झगडे, यशराज जगदाळे, सागर भिसे, सचिन सपकाळ, दत्तात्रय थोरात, सरपंच चित्रलेखा ढोले,तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य व स्थानिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, शासनाच्या विविध योजना तळागाळापर्यंत पोहोचण्यासाठी असे उपक्रम प्रभावी ठरतात. सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन काम करणे हेच आमचे कर्तव्य असून भविष्यातही अशा उपक्रमांना चालना दिली जाईल, असे मत जिल्हा परिषदेचे सदस्य व गटनेते श्रीमंत ढोले यांनी व्यक्त केले.

### मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर अपघात; तिघांचा जागीच मृत्यू

**अलिबाग, ता. १८ :** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर बुधवारी सकाळी झालेल्या भीषण अपघातात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला, तर तीन ते चार जण जखमी झाले. नियंत्रण सुटलेल्या कंटेनर ट्रकने अनेक वाहनांना धडक दिल्यानंतर तो उलटून इनोव्हा कारवर कोसळल्याने हा अपघात घडला.

सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास मुंबईकडे जाणाऱ्या मार्गावर हा अपघात झाला. प्राथमिक माहितीनुसार, भरधाव वेगातील कंटेनर चालकाचा ताबा सुटल्याने त्याने मार्गावरील अनेक वाहनांना जोरदार धडक दिली. त्यानंतर कंटेनर डाव्या बाजूला उलटून थेट इनोव्हा कारवर पडला. या भीषण दुर्घटनेत इनोव्हा कारमधील तिघांचा जागीच मृत्यू झाला. एकूण पाच वाहने या अपघातात नुकसानग्रस्त झाली.



अपघातानंतर तात्काळ बचावकार्य सुरू करण्यात आले. जखमींना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात हलविण्यात आले असून काहींची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. अपघातामुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला होता; मात्र पोलिसांनी तत्काळ वाहतूक सुरळीत केली. याप्रकरणी खोपोली पोलीस ठाण्यात कंटेनर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस तपास सुरू आहे.

# दौंड तालुक्यातील प्रमुख जिल्हा मार्ग रस्ते सुधारणेसाठी २५ कोटींचा निधी मंजूर : राहुल कुल

**राहुलकुमार अवचट**

पुणे, ता. १८ : दौंड तालुक्यातील खराब रस्त्यांचा प्रश्न अखेर मार्गी लागणार आहे. तालुक्यातील ८ प्रमुख जिल्हा मार्गांच्या सुधारण्यासाठी तब्बल २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, ग्रामीण भागातील दळणवळण व्यवस्थेला मोठा दिलासा मिळणार आहे. या निर्णया मागे आमदार राहुल कुल यांनी केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा महत्त्वाचा ठरला आहे.

दौंड तालुका हा शेतीप्रधान तसेच औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाचा भाग मानला जातो. विशेषतः कुरकुंभ औद्योगिक वसाहत आणि राहु नानगाव पट्टा या भागात दररोज मोठ्या प्रमाणावर मालवाहतूक होते.



मात्र, अनेक रस्ते खड्डेमय आणि खराब अवस्थेत असल्याने वाहतूक खर्च वाढत होता, अपघातांचे प्रमाणही वाढत होते. यामुळे शेतकऱ्यांना बाजारपेठेत माल पोहोचवताना अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर रस्ते सुधारणा ही तातडीची गरज बनली होती. मंजूर कामांमध्ये ५ किमी, २ किमी, २.६ किमी, ३.५ किमी, १.५ किमी, २.३ किमी, ३.५ किमी आणि २.५ किमी लांबीच्या रस्त्यांचा समावेश आहे. या सर्व रस्त्यांवर खडीकरण आणि डांबरीकरण करून त्यांना दर्जेदार बनवण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, पाटस, तामखडा, राहु, टेळेवाडी, कुरकुंभ, खोर आणि राजेगाव या महत्त्वाच्या गावांना जोडणाऱ्या मार्गांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

या निधीमुळे केवळ रस्त्यांची दुरुस्ती होणार नाही, तर संपूर्ण भागाच्या आर्थिक गतीला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. उद्योग क्षेत्रासाठी जलद वाहतूक, शेतकऱ्यांसाठी कमी खर्च आणि नागरिकांसाठी सुरक्षित प्रवास असा तिहेरी फायदा होणार आहे.

दरम्यान, आमदार राहुल कुल यांनी सांगितले की, हे काम लवकरच प्रत्यक्षात सुरू होईल आणि गुणवत्तेवर विशेष भर दिला जाईल. राज्य सरकारच्या अर्थसंकल्पातून मिळालेला हा निधी म्हणजे केवळ विकासकाम नाही, तर ग्रामीण भागाला मुख्य प्रवाहाशी जोडण्याचा प्रयत्न आहे. स्थानिक नागरिक आणि उद्योग क्षेत्रातून या निर्णयाचे स्वागत होत असून, रस्ते चांगले झाले तर गावांचा विकास आपोआप होतो, अशी प्रतिक्रिया उमटत आहे.

# मांजरी बुद्रुकमध्ये कॅनॉल ओव्हरफ्लो घुले वस्ती-गोपाळपट्टी रोड जलमय

**हडपसर, ता. १८ :** पुणे शहराच्या पूर्व भागातील मांजरी बुद्रुक येथे कॅनाल ओव्हरफ्लो झाल्याने घुले वस्ती, ढेरे बंगला आणि गोपाळ पट्टी रोड परिसर अक्षरशः पाण्याखाली गेला आहे. अचानक वाढलेल्या पाण्याच्या प्रवाहामुळे रस्ते आणि गल्लीबोळ जलमय झाले असून संपूर्ण परिसरात भीती आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मंगळवारी सायंकाळी कॅनालमधील पाण्याची पातळी झपाट्याने वाढल्याने पाणी थेट रस्त्यावर आले. परिणामी मुख्य मार्गांसह अंतर्गत रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने वाहतुकीचा पूर्णपणे बोजवारा उडाला. त्यामुळे गोपाळ पट्टी रोड आणि ढेरे बंगला परिसरात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या.



अनेक दुचाकी आणि चारचाकी वाहने पाण्यात बंद पडल्याच्या घटना समोर आल्या असून नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. शाळा, नोकरी आणि व्यवसायासाठी बाहेर पडलेल्या नागरिकांचे हाल झाले असून काहींना अर्ध्या रस्त्यातूनच परतावे लागले. साचलेल्या पाण्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि पादचारी यांना पाण्यातून मार्ग काढताना जीव मुठीत धरावा लागत आहे.

स्थानिकांनी प्रशासनाच्या निष्काळजीपणावर संताप व्यक्त करत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. कॅनालमधील पाण्याचा निचरा तात्काळ करण्यात यावा, तसेच वाहतूक सुरळीत करण्यासाठी पर्यायी व्यवस्था उभी करावी, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवले जात असल्याचे सांगण्यात येत असले तरी प्रत्यक्षात नागरिकांना दिलासा देणारी ठोस कारवाई कधी होणार, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. नागरिकांना अनावश्यक प्रवास टाळण्याचे आणि पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# बदलापूर-अंबरनाथच्या ग्रामीण भागात 'न्याया'साठी 'टीस'चा पुढाकार; कोल्हेवाडी, चोणमध्ये मूलभूत सुविधांचा वनवास

## भावी कायदेतज्ज्ञांनी अनुभवले ग्रामीण वास्तव

**बदलापूर, ता. १८ :** मुंबईतील नामांकित टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसच्या स्कूल ऑफ लॉ, राईट्स अँड कॉन्स्टिट्युशनल गव्हर्नन्स अंतर्गत एलएलएम २०२५ -२६ बॅचच्या ३८ विद्यार्थ्यांनी, एका संशोधकाने तसेच दोन माजी विद्यार्थ्यांनी बदलापूर आणि अंबरनाथ तालुक्यातील ग्रामीण भागाचा पाच दिवसांचा सखोल अभ्यास दौरा केला.

डॉ. देवकुमार जेकोब यांच्या मार्गदर्शनाखाली १२ ते १५ मार्च २०२६ दरम्यान राबवण्यात आलेल्या या ग्रामीण क्षेत्र अभ्यास उपक्रमाचा उद्देश पारंपरिक शिक्षणपद्धतीच्या पलीकडे जाऊन कायदा आणि ग्रामीण वास्तव यांचा संगम विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवता यावा हा होता. या अभ्यासादरम्यान कातकरी आदिवासी वस्ती असलेल्या कोल्हेवाडी, चोण, उंबरोली, शील आणि येववाडी या गावांमध्ये घरगुती सर्वेक्षण आणि संस्थात्मक नकाशांकन करण्यात आले. या माध्यमातून नागरिकांच्या मूलभूत हक्कांबाबत, शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतील अडचणी आणि सामाजिक-कायदेशीर समस्यांचा अभ्यास करण्यात आला.

उपक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांना ग्रामीण प्रशासन व आदिवासी विकासाच्या आव्हानांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. स्थानिक नेते हरीश सुदाम वाघे (प्रकल्प समन्वयक, वनधन विकास केंद्र), ग्रामपंचायत पदाधिकारी आणि माजी विद्यार्थ्यांशी संवाद साधत विद्यार्थ्यांनी स्थानिक प्रशासनाची रचना आणि कार्यपद्धती समजून घेतली.

गावातील नागरिकांनी मांडलेल्या समस्यांमधून प्रशासनातील उणिवा प्रकर्षाने पुढे आल्या. कोल्हेवाडी गावात जाण्यासाठी कोणतीही पक्की रस्त्याची सुविधा नसून मुख्य रस्त्यापासून सुमारे २ ते ३ किमी पायपीट करावी लागते. तसेच, या गावात शासकीय बससेवाही उपलब्ध नसून नागरिकांना खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागते. गावात अंगणवाडी आणि प्राथमिक आरोग्य केंद्राचा अभाव असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आहे.

चोण गावात २०१५ मध्ये मंजूर झालेल्या घरकुलांच्या हप्त्यांचे पैसे १० वर्षांनंतरही पूर्ण मिळालेले नाहीत. शाळा दूर आहे, रस्ता नाही आणि आधार कार्ड नसल्याने शासकीय सुविधा मिळत नाहीत, अशी आर्त प्रतिक्रिया गावकऱ्यांनी व्यक्त केली. उंबरोली येथे बालविवाहाच्या घटना आणि कागदपत्रांच्या अभावामुळे मुलांचे जन्म दाखले व आधार कार्ड



रखडल्याचे वास्तव समोर आले.

शील आणि येववाडी गावातही कातकरी समाज मोठ्या प्रमाणात वास्तव्यास असून, मूलभूत सुविधा आणि शासकीय योजनांचा लाभ मिळण्यात अडचणी येत असल्याचे विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आले. १३ मार्च रोजी आयोजित करण्यात आलेल्या जनसुनावणी कार्यक्रमात सुमारे ३०० नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत आपली गाऱ्हाणी मांडली.

पंचायत समिती अंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, बांधकाम विभाग, अंगणवाडी यंत्रणा तसेच योजनांची अंमलबजावणी करणारे विविध अधिकारी उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या ऐकून घेत होत्या. आधार कार्ड नसल्याने रेशन मिळत नाही, घरकुल मिळत नाही आणि जमिनीचे हक्क प्रलंबित आहेत, अशा विविध तक्रारी नागरिकांनी मांडल्या.

या उपक्रमाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे कायदेशीर जनजागृती. विद्यार्थ्यांनी मराठी भाषेत माहितीपर पोस्टर्स तयार करून विविध शासकीय योजना आणि कायदेशीर हक्क सोप्या भाषेत नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. अभ्यासाच्या अंतिम दिवशी विद्यार्थ्यांनी बदलापूर व मुंबई परिसरात कार्यरत असलेल्या एका स्वयंसेवी संस्थेला भेट देऊन बिगर-शासकीय घटकांची भूमिका समजून घेतली. या भेटीत विद्यार्थ्यांनी आपल्या निरीक्षणांची देवाणघेवाण केली आणि संभाव्य हस्तक्षेप क्षेत्रांवर चर्चा केली.

या संपूर्ण उपक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी केवळ समस्या नोंदवण्यापुरते न राहता त्या समस्यांच्या मुळाशी जाण्याचा आणि त्यामागील प्रशासकीय व सामाजिक कारणे समजून घेण्याचा प्रयत्न केला. तसेच, प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दरी कमी करण्यासाठी संवादाचे व्यासपीठ निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

दरम्यान, विद्यार्थ्यांनी या अनुभवाबाबत आपली मते व्यक्त करताना सांगितले की, पुस्तकी ज्ञान आणि प्रत्यक्ष वास्तव यामध्ये मोठी दरी आहे. न्याय केवळ कागदावर कसा दिसतो आणि प्रत्यक्षात नागरिकांना तो मिळवण्यासाठी किती अडचणींचा सामना करावा लागतो, हे आम्हाला या दौऱ्यात प्रकर्षाने जाणवले.

आरजू आणि तेजस यांनी सांगितले की, हा अनुभव आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाचा एक्स्पीरिएन्शियल लर्निंग ठरला. या संकल्पनेचा प्रत्यक्षात योजनांच्या अंमलबजावणीशी असलेला संबंध आम्हाला समजला. कागदोपत्री न्याय आणि प्रत्यक्षातील न्याय यातला फरक आम्हाला या दौऱ्यात स्पष्टपणे जाणवला. भविष्यात कायदेक्षेत्रात काम करताना अशा वास्तवाधारित अनुभवांचा निश्चितच उपयोग होईल आणि अधिक संवेदनशील व जबाबदार पद्धतीने काम करण्याची प्रेरणा आम्हाला या उपक्रमातून मिळाली.

या उपक्रमातून कायद्याचा अधिकार हा केवळ संकल्पना न राहता तो प्रत्यक्षात प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवण्यासाठी संवेदनशील, जबाबदार आणि वास्तवाशी जोडलेले प्रयत्न आवश्यक असल्याचे अधोरेखित झाले.

# हॉटेल व्यावसायिकाला जीवे मारण्याची धमकी




**वालचंदनगर, ता. १८ :** हॉटेलमध्ये वाढदिवसानिमित्त लावलेल्या आवाजाचा त्रास होत असल्याचा राग मनात धरून पाच जणांनी हॉटेलच्या खिडक्यांच्या काचा व कुंड्यांचे नुकसान करून हॉटेल व्यवसायिकाला जीवे मारण्याची धमकी देण्यात दिली. याप्रकरणी वालचंदनगर पोलिसांनी पाच जणांवर गुन्हा दाखल केला असून यामध्ये दोन महिलांसह दोन पुरुषांचा समावेश आहे.

हि घटना शनिवारी (१४ ) रात्री पाऊणेनऊ वाजण्याच्या सुमारास वालचंदनगर परिसरातील ३९ फाटा जाचकवस्ती येथील अमर बार गार्डन व बिअर बार हॉटेलवर घडली आहे. याप्रकरणी हॉटेल चालकाने वालचंदनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

परशुराम अंबादास कदम (वय-४५, रा. बेलवाडी, इंदापूर) असे हॉटेल व्यावसायिकाचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार वालचंदनगर पोलिसांनी रमेश तुकाराम जामदार, उमेश रमेश जाम दार, सुवर्णा रमेश जामदार, रेश्मा उमेश जामदार, तन्मय सतीश शिंदे (सर्व रा. ३९ रा. सर्वजण जाचकवस्ती, ता. इंदापूर) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी परशुराम कदम यांचे ३९ फाटा येथे 'अमर बार गार्डन' नावाचे हॉटेल आहे. शनिवारी संध्याकाळी हॉटेलमध्ये काही ग्राहकांचा वाढदिवस साजरा होत होता. यावेळी गाणी मोठ्या आवाजात सुरू होती आणि ग्राहकांचे आपसात बोलणे सुरू असताना आरोपींनी तिथे येऊन गोंधळ घातला. येथे काय गोंधळ आणि तमाशा चालू आहे, आम्हाला याचा त्रास होत आहे, असे म्हणत आरोपींनी फिर्यादी परशुराम कदम यांना शिवीगाळ आणि दमदाटी करण्यास सुरुवात केली. एवढ्यावरच न थांबता आरोपींनी हॉटेलच्या बाहेरील कुंड्या आपटून फोडल्या आणि हॉटेलच्या खिडक्यांवर दगडफेक केली. या दगडफेकीत खिडक्यांच्या काचा फुटून हॉटेलचे मोठे नुकसान झाले आहे. याप्रकरणी पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. तपास वालचंदनगर पोलीस करीत आहेत.

# मुळशीचे पाणी पूर्ववाहिनी खोऱ्यात वळवण्याबाबत जलसंपदा मंत्र्यांच्या उपस्थितीत आढावा बैठक

## आमदार राहुल कुल यांच्या प्रयत्नांना यश

**राहुलकुमार अवचट**

पुणे, ता. १८ : मुळशी प्रकल्पाद्वारे कृष्णा खोऱ्यातील नैसर्गिकरित्या पूर्वेकडे वाहणारे पाणी, जे वीजनिर्मितीसाठी कृत्रिमरित्या पश्चिमकडे वळविण्यात आले होते, ते पुन्हा पूर्वेकडील खोऱ्यात वळविण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रस्तावाबाबत मंत्रालयात महत्त्वाची बैठक पार पडली. दौंडचे आमदार राहुल कुल यांच्या पाठपुराव्या व विनंतीनुसार आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रकल्पाचा सविस्तर आढावा घेतला.




यावेळी जलसंपदा विभागाचे सचिव संजय बेलसरे, विभागाचे सर्व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते, तर टाटा प्रकल्पाचे अधिकारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

मुळशी धरणाचे पाणी वीजनिर्मितीसाठी पश्चिमेकडे वळवले जाते, मात्र हे पाणी पुन्हा पूर्वेकडील भीमा-कृष्णा खोऱ्यात वळवल्यास पुणे जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्रातील शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायम स्वरूपी सुटू शकतो, अशी भूमिका आमदार राहुल कुल यांनी सातत्याने मांडली आहे. मार्च २०२४ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या निर्णयानुसार, पहिल्या टप्प्यात पिण्यासाठी पाणी वळविण्यास मंजुरी मिळाली होती. याच निर्णयाची आता प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हावी, यासाठी आमदार कुल यांनी बैठकीत आग्रही मागणी केली.

पहिल्या टप्प्यात जे पाणी पिण्यासाठी वळवण्याचा निर्णय झाला आहे, त्या कामाची तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. टाटा पॉवरच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून पाणी वळवण्याच्या प्रक्रियेतील तांत्रिक अडथळे दूर करण्याचे निर्देश देण्यात आले असून, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना हे काम अत्यंत प्रभावीपणे आणि विहित वेळेत पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. या बैठकीबाबत बोलताना आमदार राहुल कुल म्हणाले की, नैसर्गिकरित्या पूर्वेकडे वाहणारे पाणी कृत्रिमरित्या वळवल्यामुळे आपल्या भागावर अन्याय होत होता. हे पाणी पुन्हा आपल्या खोऱ्यात आल्यास पाणी व्यवस्थापन अधिक सक्षम, समतोल आणि शाश्वत होईल. हा निर्णय राज्याच्या सिंचन इतिहासात मैलाचा दगड ठरेल.

# पुणे जिल्हा परिषद अध्यक्षपदी वीरधवल जगदाळे तर उपाध्यक्षपदी वळसे पाटील बिनविरोध




**दौंड, ता. १८ :** तब्बल चार वर्षांपासुन रखडलेल्या पुणे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी दौंड तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे विरधवल जगदाळे पाटील यांची तर उपाध्यक्षपदी आंबेगाव तालुक्यातील विवेक वळसे पाटील यांची नुकतीच बिनविरोध निवड झाली आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीनंतर ९ मार्च रोजी पंचायत समिती च्या सभापती आणि उपसभापती निवड करण्यात आली होती. बुधवारी (ता. १८) पुणे जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली. जील्हा परिषदेत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी सर्वसाधारण सभा बोलावण्यात आली होती. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या वेळेत राष्ट्रवादी काँग्रेसकडून अध्यक्षपदासाठी वीरधवल जगदाळे, तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे गटनेते ॲड. विजयसिंह शिंदे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. उपाध्यक्षपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून विवेक वळसे पाटील, तर शिवसेना (शिंदे गट) चे मंगेश काकडे यांनी अर्ज दाखल केला. दुपारी तीन वाजता झालेल्या सर्वसाधारण सभेच्या कामकाजाच्या सुरुवातीपूर्वी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर दाखल उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात आली असून सर्व अर्ज वैध ठरले. यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणूक प्रक्रियेची माहिती देत उमेदवारी अर्ज माघारी घेण्यासाठी १५ मिनिटांचा अवधी जाहीर केला. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) तसेच शिवसेना (शिंदे गट) सदस्यांमध्ये चर्चा झाली. या चर्चेनंतर विरोधी पक्षाचे विजयसिंह शिंदे आणि मंगेश काकडे यांनी आपले उमेदवारी अर्ज माघारी घेतले. त्यानंतर अध्यक्षपदासाठी वीरधवल जगदाळे आणि उपाध्यक्षपदासाठी विवेक वळसे पाटील यांची बिनविरोध निवड झाल्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी जाहीर केले. दरम्यान, दौंडला जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाचा मान हा दुसऱ्यांदा मिळाला आहे. यापूर्वी वैशाली आबणे या अनुसूचित जाती राखीव प्रवर्गामधून जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा झाल्या होत्या. त्यानंतर अनेक वर्षानंतर दौंड तालुक्याला लाल दिवा मिळाला नाही.जगदाळे सलग तीन वेळा ते जिल्हा परिषदेवर निवडून गेले आहेत त्यामुळे त्यांचा प्रशासकीय कामाचा चांगला अनुभव आहे. तसेच पवार कुटुंबीयांशी त्यांचे अत्यंत जवळचे संबंध असून ते निष्ठावंत आहेत.

# युद्धग्रस्त इराणला भारताकडून मदतीचा हात; वैद्यकीय मदतीची पहिली खेप रवाना



**नवी दिल्ली, ता. १८ :** युद्धग्रस्त इराणला भारताने मदतीचा हात दिला आहे. भारताने इराणला वैद्यकीय मदत पाठवली असून, औषधांची पहिली खेप इराणी रेड क्रेसेंट सोसायटीला सुपूर्द करण्यात आली आहे. भारतातील इराणच्या दूतावासाने याबाबत माहिती दिली आहे. आम्ही भारतातील लोकांचे मनःपूर्वक आभार मानतो, अशा शब्दात दूतावासाने भारताचे आभार मानले आहेत.

अमेरिका आणि इस्त्रायलविरोधात संघर्ष सुरु असलेल्या इराणाला भारताने वैद्यकीय मदत देऊ केली आहे. मानवतेच्या दृष्टीकोनातून भारताने इराणसाठी मदतीचा हात पुढे केला आहे. गेल्या काही वर्षात भारत जगभरात विविध देशांना वैद्यकीय मदत पाठवत आला आहे. युद्धामुळे विविध अडचणींचा सामना करणाऱ्या इराणसाठी भारताकडून मिळालेली मदत मोठा दिलासा देणारी ठरणार आहे. याबाबत इराणने देखील भारताचा आभार मानले आहेत.

भारताने देऊ केलेल्या वैद्यकीय मदतीचा व्हिडीओ इराणी दूतावासाने प्रसिद्ध केला आहे. भारताकडून देण्यात आलेली वैद्यकीय मदतीची पहिली खेप इराणी रेड क्रेसेंट सोसायटीला सुपूर्द करण्यात आली आहे. आम्ही भारतातील लोकांचे मनःपूर्वक आभार मानतो, अशा शब्दात दूतावासाने भारताचे आभार मानले आहेत.

जिनिव्हा येथील संयुक्त राष्ट्रांमधील इराणचे राजदूत अली बहरेनी यांनी म्हटल्याप्रमाणे, संघर्ष सुरू झाल्यापासून इराणमध्ये १३०० हून अधिक लोक मारले गेले असून ७ हजार हून अधिक जखमी झाले आहेत. जागतिक आरोग्य संघटनेने देखील १८ आरोग्य सुविधांवर हल्ला झाल्याचे सांगताना ०८ वैद्यकीय कर्मचारी मरण पावल्याचे म्हटले आहे. पण, विविध समस्यांचा सामना करत इराणमधील वैद्यकीय सुविधा सुरु असल्याचे संघटनेने नमूद केले आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## सकाळी रिकाम्या पोटी ताक पिण्याचे जबरदस्त फायदे; पचन, वजन आणि इम्युनिटीसाठी रामबाण उपाय

उन्हाळ्याच्या दिवसांत शरीराला थंडावा देणारे आणि आरोग्याला लाभदायक असे पेय म्हणजे ताक. तज्ज्ञांच्या मते, दररोज सकाळी रिकाम्या पोटी एक ग्लास ताक पिल्यास शरीराला अनेक आरोग्यदायी फायदे मिळू शकतात. हे साधे दिसणारे पेय पचन सुधारण्यापासून ते वजन नियंत्रणापर्यंत महत्त्वाची भूमिका बजावते.

ताकामध्ये नैसर्गिक प्रोबायोटिक्स असतात, जे पचनसंस्था मजबूत ठेवण्यास मदत करतात. त्यामुळे गॅस, ॲसिडिटी, अपचन आणि पोटफुगी यांसारख्या समस्या कमी होतात. विशेषतः जिरे आणि काळे मीठ घालून घेतल्यास त्याचा परिणाम अधिक चांगला दिसून येतो.

ताक शरीराला हायड्रट ठेवण्यास मदत करते. उष्णतेमुळे होणारी पाण्याची कमतरता भरून काढण्यासाठी ताक अत्यंत उपयुक्त ठरते. यामुळे शरीराला थंडावा मिळतो आणि थकवा कमी होतो.

वजन कमी करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांसाठी ताक हा उत्तम पर्याय आहे. कमी कॅलरी आणि कमी फॅट असल्यामुळे ते पोट भरल्यासारखे वाटते आणि जास्त खाणे टाळण्यास मदत करते. त्यामुळे वजन नियंत्रणात राहते.

तसेच ताकामध्ये कॅल्शियम, व्हिटॅमिन्स आणि खनिजे मोठ्या प्रमाणात असतात. यामुळे हाडे मजबूत राहतात आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढते. ताकातील पोटॅशियम आणि मॅग्नेशियममुळे रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासही मदत होते.

सकाळी रिकाम्या पोटी किंवा जेवणानंतर ताक पिणे फायदेशीर ठरते. त्यात जिरे, कोथिंबीर किंवा काळे मीठ घालून घेतल्यास चव आणि फायदे दोन्ही वाढतात.

ताक आरोग्यासाठी फायदेशीर असले तरी जास्त प्रमाणात सेवन टाळावे. काही विशिष्ट आजार असल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.




## नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा ८ वा हप्ता जमा होणार

**मुंबई, ता. १८ :** राज्यातील शेतकऱ्यांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा ८ वा हप्ता पुढील आठवड्यात थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे. या हप्त्यासाठी सरकारने १,७७४ कोटींचा निधी वितरीत करण्यास मंजुरी दिली आहे. राज्यातील पात्र ९० लाख ३४ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात ही रक्कम जमा होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या नमो शेतकरी महासन्मान निधीच्या ८ व्या हप्त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद विशेष लक्ष घालून उपलब्ध करून दिली आहे, अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या धर्तीवर राज्य शासनाने नमो शेतकरी महासन्मान निधी योजना सुरू केली आहे. पीएम किसान योजनेप्रमाणेच ही योजना राबविली जाते. पीएम किसान योजनेतून दरवर्षी ६ हजार रुपये देण्यात येते तर राज्य शासनाकडून ६,००० रुपये अनुदान दिले जाते. या योजनेमुळे आता पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात दरवर्षी एकूण १२ हजार रुपये जमा होतात. या योजनेसाठी सरकारने १,७७४ कोटी रुपयांचा निधी वितरीत करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तर प्रत्यक्षात १८२० कोटी इतकी रक्कम शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना थेट आर्थिक सहाय्य देऊन शेतीचा वाढता खर्च कमी करणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे हा मुख्य उद्देश आहे. दरम्यान, केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा २२ वा हप्ता दिनांक १३ मार्च २०२६ रोजी वितरीत केल्यानंतर राज्य शासना नेहीनमो योजनेचा आठवा हप्ता वितरीत करण्याची प्रक्रिया गतीने पूर्ण केली आहे.

## ड्रग्सविरोधात झिरो टॉलरन्स धोरण राबवणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर, ता. १८ :** नागपूर शहरातील मोतीबाग परिसरात अमली पदार्थ तस्करांविरोधात झालेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर, राज्य शासन अमली पदार्थांविरोधात झिरो टॉलरन्स धोरण राबविणार आहे. अशा गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या आरोपींची संपत्ती जप्त करण्यासह कठोर कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. मोतीबाग येथील ड्रग्स तस्करांच्या घरांवर छापे टाकून गांजा व अग्निशस्त्रांचा साठा जप्त करण्यात आल्याबाबत सदस्य प्रवीण दटके यांनी प्रश्न उपस्थित केला होता.

मुख्यमंत्री म्हणाले, संबंधित प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींविरुद्ध चार्जशीट दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, पुढील टप्प्यात कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्यांच्या मालमत्तेवर जप्तीची कारवाई केली जाणार आहे. बेकायदेशीर बांधकाम आढळल्यास सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार नोटीस देऊन महानगरपालिकेमार्फत योग्य ती कारवाई केली जाईल. तसेच संबंधित भागात विशेष मोहीम राबवून अशा गुन्ह्यांना आळा घालण्यात येईल.

भविष्यात अशा घटना घडल्यास संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनाही जबाबदार धरण्यात येईल. नागपूर पोलिसांनी ऑपरेशन थंडर अंतर्गत मोठ्या प्रमाणावर कारवाया करत गेल्या ११ महिन्यांत ९०७ गुन्हे उघडकीस आणले आहेत. यामध्ये सुमारे १२५४ किलो अमली पदार्थ जप्त करण्यात आले असून, त्यांची किंमत अंदाजे १० कोटी रुपये आहे.

# अजित दादांच्या अपघाताला क्रिमिनल अँगल; नवीन पुराव्यांसह रोहित पवार पत्रकार परिषद घेणार

**मुंबई, ता. १८ :** विधीमंडळ परिसरात पत्रकारांशी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी अजित पवार यांच्या अपघाताबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करत राज्य सरकारवर निशाणा साधला. या प्रकरणात क्रिमिनल अँगल असल्याचा संशय व्यक्त करत त्यांनी सखोल चौकशीची मागणी केली.

विधीमंडळ परिसरात पत्रकारांशी बोलताना रोहित पवार म्हणाले, अनेक दिवसांपूर्वी अधिवेशनात अजित दादांच्या अपघाताची नाहीतर घातपाताची चर्चा व्हावी यासाठी आम्ही अल्पकालीन चर्चा असेल, लक्षवेधी असेल तसेच १९३ चा प्रस्ताव असेल अशा विविध माध्यमातून हा मुद्दा चर्चेत यावा अधिवेशनामध्ये यासाठी आम्ही सर्वजणच प्रयत्न करत आहोत. पण दुर्दैव असं की महाराष्ट्र राज्याच्या सेशनमध्ये या राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादांचा अपघात जो झाला त्याच्याबद्दल साधी चर्चा करण्याची वेळ सुद्धा तिथे दिली जात नाही.

आत्ताच काही वेळापूर्वी अध्यक्ष महोदयांना मी भेटलो, विनंती केली की लवकरात लवकर अधिवेशन संपण्यापूर्वी या बाबतीतली चर्चा व्हावी. महाराष्ट्रात तर चर्चा होतच नाही, पण हा विषय हा सेंट्रल गव्हर्मेंटचा सुद्धा असल्यामुळे सीबीआय सेंट्रल गव्हर्मेंटच्या अंतर्गत येतं, त्याच्याचबरोबर एविएशन मंत्रालय त्याच्या अंतर्गत येतं. पण




हा मुद्दा संसदेतसुद्धा चर्चेला कदाचित मुद्दामून आणला जात नाही, ही दुर्दैवी गोष्ट आहे असे रोहित पवार म्हणाले. अध्यक्षांनी सांगितलंय, उद्या नाही तर सोमवारी या बाबतीतली चर्चा आम्ही लावू. त्यामुळे वाट बघूया सोमवारपर्यंत काय होतंय. पण दुर्दैव असा की एवढा महत्त्वाचा मोठा मुद्दा असून सुद्धा हा खरंतर अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी चर्चेत यायला पाहिजे होता, पण दुर्दैवाने तो आलेला नाही. विधान परिषदेमध्ये शशिकांत शिंदे साहेब, अमोल मिटकरी हे सुद्धा प्रयत्न करत आहेत. विधानसभेत अधिवेशनामध्ये मी स्वतः असेल व आमचे सर्व इतर नेते ज्याच्यामध्ये जयंत पाटील साहेब असतील, इतर पक्षाचे नेते हा मुद्दा मांडण्याचा प्रयत्न करत आहेत, पण ती काय चर्चा मुद्दामून कदाचित करून दिली जात नाही असं आपल्याला बघायला मिळत आहे असेही रोहित पवार यांनी सांगितले.

या अपघाताला क्रिमिनल अँगल असू शकतो, म्हणून आपण क्रिमिनल इन्वेस्टिगेशन तिथं मागत आहोत. एफआयआर, सीबीआय इन्क्वायरी, सीआयडी त्याचाच एक भाग झाला. सीबीआयच्या बाबतीत आम्हाला दिल्लीत गेल्यानंतर असं कळतंय की अजूनपर्यंत महाराष्ट्र राज्याने प्रस्ताव हा दिल्लीपर्यंत सीबीआयचा दुर्दैवाने पाठवलेला नाही.

कुणी ना कोणीतरी मोठा व्यक्ती या विषयाच्या पाठीमागे आहे, म्हणूनच कुठेतरी व्हीएसआरला वाचवलं जातंय असं आमचं आधीपासूनच मत आहे. पण आतापर्यंत जी माहिती आम्ही पुढे आणली होती ती थोडक्यात माहिती होती. बरीचशी माहिती अजून आमच्यापर्यंत आहे. त्यामुळे पुढच्या काही दिवसांमध्ये सरकारकडून काय केलं जातं हे आपल्याला लागेल आणि नंतर नाइलाज होऊन जी काही शेवटची माहिती आहे आणि मोठी माहिती आहे ती आपल्या सर्वांच्या माध्यमातून लोकांकडून आम्ही आणल्याशिवाय राहणार नाही असे रोहित पवार म्हणाले.

## एसटी महामंडळात १७ हजार ७४२ चालक-वाहकांची कंत्राटी भरती; परिवहन मंत्र्यांची घोषणा


**मुंबई, ता. १८ :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) तब्बल १७ हजार ७४२ चालक व वाहक कर्मचाऱ्यांची कँत्राटी पद्धतीने भरती करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. ही भरती एसटी महामंडळात लवकरच दाखल होणाऱ्या ८ हजार ३०० नव्या बसेससाठी करण्यात येणार आहे.

महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान विधानपरिषदेत बोलताना सरनाईक यांनी ही घोषणा केली. ते म्हणाले की, नव्या बसेसची खरेदी केल्यानंतर त्या चालवण्यासाठी आणि सेवा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध असणे गरजेचे आहे. त्यामुळे तातडीने कँत्राटी भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सरकारकडून नियमित भरतीसाठी



अर्थ विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. मात्र, त्या भरतीस मंजुरी मिळेपर्यंत ही कंत्राटी भरती केली जाणार असल्याचे सरनाईक यांनी स्पष्ट केले. मागील वर्षीही कंत्राटी मेगाभरतीची घोषणा करण्यात आली होती, मात्र ती काही कारणांमुळे पुढे ढकलण्यात आली होती. त्यामुळे यंदा घोषित केलेली भरती प्रत्यक्षात कधी सुरू होणार, याकडे इच्छुक उमेदवारांचे लक्ष लागले आहे. एसटी महामंडळाकडून कंत्राटी पद्धतीने सुमारे १७ हजार ४५० चालक व सहाय्यकांची भरती केली जाणार आहे. या भरतीसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार असून ती राज्यातील ६ प्रादेशिक विभागांनुसार केली जाण्याची शक्यता आहे. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित संस्थांकडून एसटी महामंडळाला आवश्यक मनुष्यबळ वेळेत उपलब्ध करून दिले जाईल. या कंत्राटी भरतीत निवड झालेल्या उमेदवारांना सुमारे ३० हजार रुपये मासिक वेतन देण्यात येणार आहे. तसेच, निवड झालेल्या चालक व सहाय्यकांना एसटीकडून आवश्यक प्रशिक्षणही दिले जाणार आहे, जेणेकरून सेवा दर्जेदार व सुरक्षित राहील. या भरती प्रक्रियेच्या माध्यमातून राज्यातील हजारो बेरोजगार तरुण-तरुणींना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे इच्छुकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहनही परिवहन मंत्र्यांनी केले आहे. दरम्यान, एसटी महामंडळात नव्या बसेसची भर पडल्यामुळे प्रवाशांना अधिक चांगली, अखंडित आणि सुरक्षित बससेवा देणे शक्य होईल, असा विश्वासही सरनाईक यांनी व्यक्त केला. वाढत्या प्रवासी संख्येचा विचार करता मनुष्यबळाची गरज भागवण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

## सरकार परिस्थितीची माहिती देण्यास तयार नाही : जयंत पाटील यांचा आरोप




**मुंबई, ता. १८ :** विधानसभा अध्यक्षांनी निर्देश देऊनही एलपीजी सिलिंडरच्या व्यापक तुटवड्याबाबत चर्चा करण्यास आणि त्याविषयीची माहिती देण्यास महाराष्ट्र सरकार तयार नाही, असा आरोप राष्ट्रवादी(शप) विधिमंडळ पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी केला आहे. पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, गॅस संकटाचे व्यवस्थापन करण्यात राज्य आणि केंद्र सरकार पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. महायुती सरकार विरोधकांवर दोष ढकलण्याचा प्रयत्न करत आहे. सरकारने जनतेला आणि सर्व राजकीय पक्षांना विश्वासात घेतले पाहिजे. सध्या एलपीजीचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा जाणवत असून, सर्वत्र सिलिंडरसाठी लांबच लांब रांगा दिसून येत आहेत. ही परिस्थिती अजिबात चांगली नाही. त्यामुळे मुख्यमंत्री महोदयांनी आतापर्यंत यात हस्तक्षेप करणे अपेक्षित होते. एलपीजीच्या सद्यस्थितीबाबत माहिती देण्यास सरकार तयार नाही, तसेच विधानसभेत या विषयावर चर्चा करण्यासही सरकारची तयारी नाही. हे डबल इंजिन सरकार हे संकट सोडवण्याची आपली जबाबदारी झटकत आहे. आंतरराष्ट्रीय घडामोडींचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की, देशात जहाजे दाखल झाल्याबद्दल जो आनंदोत्सव साजरा केला जात आहे, त्यामध्ये एका महत्त्वाच्या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष केले जात आहे, ते म्हणजे अशा अनेक मालवाहू जहाजांची देशाला दररोज गरज असते. तसेच, इराणसारख्या देशांशी संबंध ताणले गेल्याचा परिणाम एलपीजीच्या पुरवठ्यावर होत असल्याचा दावाही त्यांनी केला.

## दहिवडी प्रकरणी तीन संशयित ताब्यात; दोन घटनांमधील साम्यामुळे गूढ गडद

**योगेश मारणे**

न्हावरे, ता. १८ : दहिवडी(ता. शिरूर) परिसरातील मांजरेवस्ती येथे  वर्षीय मुलाच्या संशयास्पद मृत्यूने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असून,या प्रकरणाचा तपास पोलिसांकडून अतिशय कसून आणि गोपनीय पद्धतीने सुरू आहे. दरम्यान,या प्रकरणी तीन संशयितांना ताब्यात घेण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.

साईराज गणेश मांजरे(वय-१२ या लहानग्याचा मृत्यू मंगळवारी (ता.१७) सायंकाळी उघडकीस आला.विशेष म्हणजे, याच ठिकाणी यापूर्वी २१ जून २०२४ रोजी यश शरद गायकवाड (वय ११) या मुलाचाही मृतदेह आढळून आला होता. दोन्ही घटनांमध्ये आढळणारे साम्य लक्षवेधी ठरत असून, त्यामुळे



या प्रकरणाचे गूढ अधिकच गडद झाले आहे.

फॉरेन्सिक तपासणी आणि शवविच्छेदन अहवालानुसार, दोन्ही मृतदेहांवर डोक्याला मागच्या बाजूला व पोटावर खोल जखमा आढळून आल्या आहेत. त्यामुळे या मृत्यूमागे नेमके कारण काय,याबाबत विविध तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. यापूर्वी घडलेल्या यश गायकवाड प्रकरणात तपास यंत्रणांनी बिबट्याच्या हल्ल्याची शक्यता व्यक्त करत प्रकरण निकाली काढले होते. मात्र, सध्याच्या घटनेत आढळणारे साम्य पाहता, दोन्ही घटनांमागे वेगळाच काहीतरी धागा असल्याची शंका व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, काही ठिकाणी या प्रकाराला नारबळी किंवा सायको किलरचा अँगल असल्याचीही चर्चा रंगू लागली आहे.पोलिसांनी या सर्व बाबींचा बारकाईने तपास सुरू केला असून, ताब्यात घेतलेल्या संशयितांकडून महत्त्वाची माहिती मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या प्रकरणाचा लवकरच उलगडा करण्यात येईल, असा विश्वास पोलिस अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. सध्या संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, नागरिकांकडून या घटनेचा सखोल तपास करून सत्य बाहेर आणण्याची मागणी जोर धरत आहे.

## चिमुरडीवरील ॲसिड हल्ल्याच्या निषेधार्थ संगमनेर तालुक्यात संतापाची लाट

**अहिल्यानगर, ता. १८ :** वडगाव पान येथील एका १३ वर्षीय शालेय विद्यार्थिनीवर झालेल्या भ्याड ॲसिड हल्ल्याच्या निषेधार्थ संपूर्ण संगमनेर तालुक्यात संतापाची लाट उसळली आहे. काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सामान्य नागरिक, महिला, विद्यार्थिनी आणि युवकांनी एकत्र येत तळेगाव फाटा येथे रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी संगमनेर तालुक्यात चाललंय काय? असा संतप्त सवाल उपस्थित करत, आरोपीला कठोर शिक्षा व्हावी आणि महिलांच्या सुरक्षेसाठी सरकारने कडक कायदे करावेत, अशी आग्रही मागणी युवक काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात यांनी केली आहे.




यावेळी बोलताना डॉ. जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, एका चिमुकलीवर झालेला हा हल्ला अत्यंत दुर्दैवी आणि माणुसकीला काळीमा फासणारा आहे. प्रशासनाने या घटनेतील आरोपीचा तातडीने शोध घेऊन त्याला अशी कठोर शिक्षा करावी, जेणेकरून भविष्यात कोणाचेही असे कृत्य करण्याचे धाडस होणार नाही. गेल्या काही दिवसांत पठार भागात एका युवतीवर चाकू हल्ला झाला आणि आता हा ॲसिड हल्ला, या घटना सुसंस्कृत संगमनेर तालुक्यासाठी चिंताजनक आहेत.

पीडित मुलीच्या प्रकृतीबाबत बोलताना डॉ. थोरात यांनी हळहळ व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, प्रवरा रुग्णालयात जाऊन मी त्या मुलीची भेट घेतली. तिचा चेहरा आणि डोळे गंभीररीत्या भाजले असून ती प्रचंड वेदनेत आहे. ती लहान मुलगी सध्या बोलण्याच्या स्थितीतही नाही.

समाज म्हणून आपण जात, धर्म आणि राजकारण बाजूला ठेवून महिलांच्या सुरक्षिततेसाठी एकत्र येणे गरजेचे आहे. शाळा, महाविद्यालये आणि मुख्य रस्त्यांवर सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करावी आणि ग्रामीण भागात पोलिसांची गस्त वाढवावी, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

## पूर्व हवेलीत बेकायदा गुंठेवारीचे पेव; ग्राहकांना भुलवण्यासाठी चक्क ‘हेलिकॉप्टर राईड’चे आमिष

### विमानतळाचे नाव अन् टोप्या घालण्याचे काम सुरु

**उरुळी कांचन, ता. १८ :** पुणे शहरालगतच्या पूर्व हवेलीतील लोणी काळभोर, उरुळी कांचन आणि पेरणेफाटा परिसरातील मोक्याच्या जमिनींवर सध्या अनधिकृत प्लॉटिंगचा अक्षरशः सुळसुळाट झाला आहे. ग्राहकांना जाळ्यात ओढण्यासाठी आता थेट ‘हेलिकॉप्टर राईड’सारखी अजब आमिषे दाखवली जात असून, या चकाकीच्या मागे फसवणुकीचे मोठे रॅकेट असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. प्रशासकीय डोळेझाक आणि दलालांच्या वाढत्या हस्तक्षेपामुळे भविष्यात हा परिसर बकाल होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

पुरंदरचा नियोजित विमानतळ, रेल्वेचे जाळे, बड्या शैक्षणिक संस्था आणि औद्योगिकरणाचा बागुलबुवा उभा करून ग्राहकांना स्वस्त प्लॉटचे स्वप्न दाखवले जात आहे. कोणतीही एन.ए. परवानगी नाही की ले-आउट मंजूर नाही, तरीही बेधडकपणे रस्ते, ड्रेनेज आणि कँपाउंड करून गुंठेवारी सुरू आहे. सोशल मीडियापासून ते गल्लीबोळातील होर्डिंग्जपर्यंत जाहिरातींचा पाऊस पाडला जात आहे.

पूर्व हवेलीतील एका बड्या व्यावसायिकाने तर मार्केटिंगची हद्दच ओलांडली आहे. प्लॉट खरेदी करणाऱ्या कुटुंबाला चक्क ‘हेलिकॉप्टर राईड’ देण्याचे आमिष




दाखवले जात आहे. इतकेच नव्हे, तर ‘डोअर टू डोअर’ मार्केटिंग करून आकर्षक भेटवस्तू वाटल्या जात आहेत. या झगमगाटामुळे सर्वसामान्य नागरिक कागदपत्रांची पडताळणी न करताच कष्टाची पुंजी या अनधिकृत जाळ्यात गुंतवत आहेत.

या अनधिकृत व्यवसायात गावागावातील स्थानिक नेतेमंडळी आणि सुशिक्षित बेरोजगार तरुण मोठ्या प्रमाणात शिरले आहेत. कमिशनच्या हव्यासापोटी शेतकऱ्यांकडून अल्प दरात जमिनी घेऊन त्याचे तुकडे पाडले जात आहेत. जमीन खरेदी-विक्रीच्या वादातून पूर्व हवेलीत गुन्हेगारी वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, महसूल विभागातील काही कर्मचाऱ्यांचे याकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष होत असल्याची चर्चाही दबक्या आवाजात सुरू आहे. लोणी काळभोर, उरुळी कांचनला वाढले प्लॉटिंग व्यावसायिक लोणी काळभोर, सोरतापवाडी, शिंदवणे व उरुळी कांचन परिसरात परवानगी न घेता शेतीजमिनींचे लहान-लहान प्लॉट पाडून विक्री केली जात आहे. काही ठिकाणी तर रस्ते, वीज, पाणी किंवा इतर मूलभूत सुविधा नसतानाही रेसिडेन्शियल प्लॉट म्हणून ग्राहकांची दिशाभूल केली जात आहे. अनधिकृत प्लॉटिंग व्यवसाय मोठ्या प्रमाणावर वाढला असून शेतीजमिनींचे तुकडे करून विक्री करण्याचा प्रकार खुलेआम सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. तसेच पुरंदर तालुक्यात भविष्यात नव्याने होणाऱ्या विमानतळामुळे लोणी काळभोरसह परिसरातील अनेक नवीन प्लॉटिंग व्यावसायिक या ठिकाणी उतरले आहेत.